महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ११/०८/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.टिआरए-१०१९/ प्र.क्र.११३/ पोल-८ दिनांक ०८ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** मुंबई वाहतूक पोलीस विभागांतर्गत असलेल्या शिक्षण विभागामार्फत सन २०२२-२३ साठी राबविण्यात आलेल्या वार्षिक उपक्रमासाठी झालेल्या अतिरिक्त खर्चास कार्योतर मुजूरी तसेच निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.टिआरए-१०१९/ प्र.क्र.११३/ पोल-८, दिनांक ०८ ऑगस्ट, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८०८११५७४७७८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस आयुक्त, (वाहतूक), मुंबई.
सह पोलीस आयुक्त, (वाहतूक), वरळी, मुंबई.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

मुंबई वाहतूक पोलीस विभागांतर्गत असलेल्या शिक्षण विभागामार्फत सन २०२२-२३ साठी राबविण्यात आलेल्या वार्षिक उपक्रमासाठी झालेल्या अतिरिक्त खर्चास कार्योत्तर मंजूरी तसेच निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक : टिआरए-१०१९/प्र.क्र.११३/पोल-८**

दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०८ ऑगस्ट, २०२३.

वाचा :-

१) शासन निर्णय, गृह विभाग क्र. टिआरए-१०१९/प्र.क्र.११३/पोल-८, दिनांक ०३.०२.२०२३.

२) पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई यांचे क्र.CP/D.१४/(PJS)/Budget/८९/२०२३,दि.१५.३.२०२३

३) सह पोलीस आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई यांचे क्र. CP/D.१४/(PJS)/ Budget/९१/२०२३,दि.१७.३.२०२३.

४) अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, यांचे क्र.२१३८/अपोआ/वा/शैक्षणिक उपक्रम/२०२३, दि.३०.०५.२०२३.

५)लेखा अधिकारी, कक्ष-१४, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे क्र.पोआ/कक्ष-१४(अर्थसंकल्प शाखा)/प्रिजंशि/ कराम/२०८/२०२३, दि.२२.०६.२०२३.

प्रस्तावना :-

मुंबई वाहतूक पोलीस विभागामधील शिक्षण विभागामार्फत दरवर्षी मुंबई शहरातील वाहतूक नियमन व नियंत्रणाबरोबर अनेक रचनात्मक प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी रु.४७,७१,०७८/- (रुपये सत्तेचाळीस लाख एकाहत्तर हजार अठ्ठयाहत्तर फक्त) इतक्या खर्चास संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ व ३ नुसार, सदर उपक्रमासाठी एकूण रु.४९,३९,४४२/- **( प्रथमत: रु.४५,५२,९६५/- व रु.३,८६,४७७/- इतका अतिरिक्त खर्च )** झालेला आहे. संदर्भ क्र.१ अन्वये मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा रु.१,६८,३६४/- इतका अतिरिक्त खर्च झाला असून त्यास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत तसेच सदर निधी उपलब्ध करून देण्याबाबत संदर्भ क्र.३ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यानुसार, सदर अतिरिक्त खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

मुंबई वाहतूक पोलीस विभागामधील शिक्षण विभागामार्फत दरवर्षी मुंबई शहरातील वाहतूक नियमन व नियंत्रणाबरोबर अनेक रचनात्मक प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी रु.४७,७१,०७८/- (रुपये सत्तेचाळीस लाख एकाहत्तर हजार अठ्ठयाहत्तर फक्त) इतक्या खर्चास संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

२. सदर उपक्रम राबविताना विद्यार्थ्यांना ने-आण करण्याकरिता बसेसची व्यवस्था तसेच मैदानात शामियाना, मंडप व्यवस्था पुरविण्याकरिता एकूण रु.४९,३९,४४२/- ( प्रथमत: रु.४५,५२,९६५/- व रु.३,८६,४७७/- इतका अतिरिक्त खर्च ) खर्च झालेला असून संदर्भ क्र.१ अन्वये मंजूर केलेल्या रकमेपेक्षा रु.१,६८,३६४/- (रुपये एक लाख अडुसष्ठ हजार तीनशे चौसष्ट फक्त) इतका अतिरिक्त खर्च झाला आहे. सदर अतिरिक्त झालेल्या खर्चास याद्वारे कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर खर्च मुख्यलेखाशिर्ष "बी-१, २०५५-पोलीस, १०८ राज्य पोलीस मुख्यालय, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस आस्थापना, (२०५५००९७)-(१३-कार्यालयीन खर्च)" या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दि. १७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग-पहिला, उप विभाग-तीन, अ.क्र.४, परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३०८०८११५७४७७८२९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHHAYA NATHU MALI

Digitally signed by CHHAYA NATHU MALI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=cd4e9f6041c76a9f3fd5cbcbc45affce68bbd6f32230f05b4a2b54b875937776, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B20C807A33573110F6D8441C862B04F58811935279DCAD666C42A2FABC6C24E8, cn=CHHAYA NATHU MALI
Date: 2023.08.08 11:58:53 +05'30'

( छाया न. माळी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
२) अपर पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई
३) सह पोलीस आयुक्त (वाहतूक), वरळी, मुंबई.
४) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
५) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखाधिकारी, मुंबई.
८) उप सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) उप सचिव (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) निवडनस्ती (पोल-८), गृह विभाग,मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner